# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
## विद्युत अभियांत्रिकी विभाग

३.२०
१८.८.२०२२
आ.क्र.

जा.क्र.उमपा/विद्युत/०२/३६
दिनांक:-१८/०८/२०२२

## निविदा सुचना

उल्हासनगर महानगरपालिका, उपविभागीय कार्यालय १ अंतर्गत अमर डाय कंपनीजवळ, सेंच्युरी रेयॉन गेस्ट हाऊस, शहाड, उल्हासनगर- १, उल्हासस्टेशन परीसर व हिराघाट, उल्हासनगर- ३ येथील गणेश विर्जजन घाट व परिसरात तात्पुरती विद्युत रोषणाई करणेबाबत सिलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीनुसार लिफाफा (१) तांत्रिक (२) वाणिज्य खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन मागविण्यात येत आहेत, निविदा सादर करण्याअगोदर साहित्य/कामाविषयी पुर्ण माहिती विद्युत अभियांत्रिकी विभागाकडून प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र. २७२०११२ वरून प्राप्त करून घ्यावी व सर्व बाबीची शहानिशा/ खात्री करून निविदा सादर करावी.

**अटी व शर्ती :**

उपरोक्त काम अत्यंत महत्वाचे व कालबद्ध कामाची सिलबंद निविदा दोन लिफाफ्यामध्ये विद्युत अभियांत्रिकी विभाग उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय, उल्हासनग- ३, येथे दिनांक २४/०८/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत स्विकारली जातील. स्विकारलेल्या निविदा दिनांक २४/०८/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत उघडण्यात येतील त्यावेळी आपण स्वत: किंवा आपल्या स्वाक्षरीने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी उपस्थित राहावे.

**लिफाफा क्र. १ (तांत्रिक) :-**

- निविदेसोबत अनामत रक्कम E.M.D स्वरुपात भरणा करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत धारकाने काम पुर्ण केलेल्याचे प्रमाणपत्र/ कार्यादेशाची (Self Attested ) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत प्रलंबित असलेल्या कामाची यादी प्रमाणपत्र (Self Attested ) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत (G.S.T ) नोंदणी प्रमाणपत्र (Self Attested ) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत PAN No. नोंदणी प्रमाणपत्र (Self Attested ) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसाबत संस्था नोंदणी प्रमाणपत्र उदा. शॉप लायसन्स अधिनियम अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र / पार्टनरशीप ॲक्ट अंतर्गत पार्टनरशीप डिड / कंपनी ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत कंपनी / भारत सुक्ष्म लघु मध्यम मंत्रालय अंतर्गत उद्योग आधार प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन (Self Attested ) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत EPFO/ESIS चे नोंदणी प्रमाणपत्र (Self Attested ) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र ( परिशिष्ट-१) १०० रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक आहे.

**लिफाफा क्र. २ (वाणिज्य) :-**

- कामाचे / साहित्याचे दर अस्तित्वात असलेल्या सर्व करांसह लेटरपॅडवर सादर करावे.
- निविदा धारकाने विद्युत साहित्य / कामासंदर्भातील घोषणापत्र प्राप्त करून सादर करणे आवश्यक आहे.

**सर्वसाधारण अटी :-**

- सादर करण्यात आलेले दर ६० दिवसापर्यत वैध राहतील.
- यशस्वी निविदाधारकाची सुरक्षा रक्कम ५% (SD) देयकातुन वजा करण्यात येईल.
- कोणतीही अट घातलेले निविदा ग्राहय धरले जाणार नाही, रद्द करण्यात येतील.
- कोणतेही कारण न देता सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सगळे निविदा स्विकारण्याचा किंवा फेटाळण्याचा हक्क राखुन ठेवला आहे.

१८.०८.२०२२

कार्यकारी अभियंता (विद्युत)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत:- १) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, उमपा यांनी सदर सुचना नोटीसबोर्डवर प्रसिध्द करावी.
२) सिस्टम ॲनालिस्ट, नागरी सुविधा केंद्र, उ.म.पा. यांनी सदर सुचना वेबसाईटवर प्रसिध्द करावी.